# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

| | | |
|---|---|---|
| बैठक स्थळ | :- | सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई |
| दिनांक | :- | ०२.०३.२०२१ (मंगळवार) |
| वेळ | :- | दुपारी ०४.०० वाजता |

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.०३.२०२१ रोजी संपन्न झालेल्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील, मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५७ वी बैठक मंगळवार दिनांक ०२.०३.२०२१ रोजी दुपारी ०४.०० वा. सहयाद्री अतिथिगृह, वसंतदादा पाटील सभागृह, कक्ष क्र.०४ मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | मा.मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. विनिता वेद सिंघल, प्रधान सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, सह सचिव काम-७ | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्रीम. वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय,कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २७.१०.२०२० रोजीच्या मंडळाच्या ५६ व्या बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत तसेच पारित ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मंडळाच्या दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न ५६ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | ०५ |
| २. | मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असणाऱ्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सुधारणा करणे व नवीन योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करणे. | ०५-०६ |
| ३. | मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरिता पाळणा घर (डे - केअर युनिट) सुविधा उपलब्ध करून देणेबाबत विचार विनिमय करणे. | ०७ |
| ४. | मध्यान भोजन योजनेकरीता कोविड विषाणू-१९ प्रादूर्भाव कालावधी लागू करण्यात असलेल्या सवलती पुढे चालू ठेवण्याबाबत विचार विनिमय करणे. | ०८ |
| ५. | कोविड – १९ विषाणू प्रादूर्भावाच्या कालावधीत नुतणीकरण न झालेल्या व बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू किंवा नैसर्गिक मृत्यू झालेल्या प्रकरणी बांधकाम कामगारांच्या वारसांना अर्थसहाय्य देणेबाबत विचार विनिमय करणे. | ०९-१० |
| ६. | अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) बाबत बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या दिनांकाची कालमर्यादा शिथील करणेबाबत. | १० |
| ७. | मंडळाचे सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ या वर्षाचे मूळ अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत विचार विनिमय करणे. | ११-१४ |
| ८. | मा. महालेखापाल यांचेकडून सन २०१८-१९ या वर्षाचे लेख्यांचे लेखापरीक्षण झाले आहे. सदर वार्षिक अहवाल मंडळाच्या मान्यतेस् सादर | १४-१५ |
| ९. | मंडळाच्या सन २०१९-२० या वर्षाच्या वार्षिक लेख्यांस मंडळाची मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे. | १५-१६ |
| १०. | मंडळाचे सन २०२०-२१ या वार्षिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक | १६ |

| अ. क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | कामकाजासाठी सनदी लेखापालांच्या नियुक्तीबाबत विचारविनिमय करणे. | |
| ११. | माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयानुसार मंडळावर नियुक्त मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन ई- गव्हर्नन्स या संस्थेकडील सल्लागारांच्या मानधनाचे दर सुधारित करणेबाबत विचारविनिमय करणे | १७ |
| १२. | मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे | १८-२० |
| १३ | उपकर परताव्याबाबतच्या प्रस्तावावर विचारविनिमय करणे | २०-२२ |
| १४ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करून त्यांना वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत निर्गमित शासन आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीस्तव सादर करणेबाबत. | २२-२३ |
| १५ | आयत्या वेळेचा विषय. | २३-२४ |

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजी संपन्न ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५६ वी बैठक दिनांक २७.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा.अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर इतिवृत्तातांत काही बदल असल्यास सुचवावा अशी विनंती मंडळ सचिवांनी केली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५७(१)/२०२१:- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजीच्या ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०२ :- मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असणाऱ्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सुधारणा करणे व नवीन योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली, मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दि.०४.०१.२०२१ रोजी देशातील अन्य ०६ राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या तुलनात्मक सादरीकरणाबाबत संपन्न बैठकीत महाराष्ट्र राज्यातील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा/बदल व नवीन योजना राबविणेबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील ०५ जिल्हा कार्यालयाचे अभिप्राय मंडळास प्राप्त झालेले आहेत. सदर बैठकीतील निर्णय व जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांमधील बदल/ सुधारणा, नवीन योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच, केंद्र शासनाचे निर्देश व कामगार संघटनांनी उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता आवश्यक ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित (Self certificate) प्रमाणपत्र घेणेबाबत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यानुसार सोबतच्या

विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना, प्रस्तावित सुधारणा/ बदल/ नवीन प्रस्तावित योजना व बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र याबाबतचा तपशील सादर करण्यात आला होता. सदर तपशीलाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव क्र.५७(२)/२०२१ :-**

**१. मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सोबतच्या सहपत्रात नमूद केल्याप्रमाणे सुधारणा/ बदल करणे, योजना बंद करणे, प्रस्तावित नवीन ०२ योजना कार्यन्वित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा.**

**२. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बहुतांश कालावधीत शाळा/ महाविद्यालये बंद होती अथवा ऑनलाईन पध्दतीने कार्यरत होती अशा स्थितीत दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ या कालावधीत शैक्षणिक सहाय्याच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी शाळा/ महाविद्यालयातील उपस्थितीची अट शिथील करण्यात येत आहे.**

**३. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत दि.३१.०३.२०२० पर्यंत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना दोन टप्प्यात रू.५०००/- अर्थसहाय्य वाटपाची कार्यवाही दि.३१.०३.२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.**

**४. मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था, संबंधित कार्यालये व अन्य संबंधित संस्था व व्यक्ती पर्यंत पोहचविण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करून सदर माहितीपुस्तिकेचे वाटप करण्यात यावे.**

**५. बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याबाबत स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certificate) बाबत अन्य राज्यांकडून माहिती प्राप्त करून मंडळाच्या आगामी बैठकीत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा,**

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०३ :- मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरिता पाळणा घर (डे - केअर युनिट) सुविधा उपलब्ध करून देणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासन मान्यतेस अनुसरून या क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थाकडून दि. ०८.०३.२०१९ रोजीच्या राज्यस्तरीय सकाळ या मराठी व देशपातळीवरील Times of India या इंग्रजी वर्तमान पत्रात सुचना प्रसिध्द करून अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest- EOI) मागविण्यात आले होते. या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांसोबत झालेल्या बैठकीत उपस्थित मुद्यानुसार प्रारूप अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) सुधारित करण्यात आले. त्यानुसार दि.१५.०५.२०१९ रोजी पुनश्च: सुधारीत अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) प्रसिध्द करून दि.०६.०६.२०१९ पर्यंत प्रस्ताव मंडळास सादर करणेबाबत सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर सुचनेच्या प्रतिसादामध्ये ५२ स्वयंसेवी संस्थानी मंडळास अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) सादर केले होते. सदर प्रस्तावांची छाननी करण्यात आली होती. तथापि, लोकसभा व विधानसभेच्या आचारसंहितेमुळे पुढील कार्यवाही होऊ शकलेली नाही. तथापि, ज्या संस्थांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत त्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींकडून विचारणा होत आहे. मंडळाकडे सादर प्रस्तावास दीड वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. आर्थिक वर्ष बदलले आहे त्यामुळे इच्छुक संस्थांची आर्थिक क्षमता तपासण्यासाठी नव्याने अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविणे प्रस्तावित आहे याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७(३)/२०२१ :- उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन पत्र क्र. इबाका-२०१७/प्र. क्र.३७१/काम-७ दि.१२.०९.२०१७ व ०८.१२.२०१७ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरून खरेदी समितीच्या मान्यतेने सुधारित अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) प्रारूप तयार करण्यात यावे. शासन मान्यतेअंती देशपातळीवरील इंग्रजी व राज्यस्तरीय मराठी वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करून या क्षेत्रातील नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक संस्थांकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय :- ०४ मध्यान्ह भोजन योजनेकरीता कोविड-१९ विषाणू प्रादूर्भाव कालावधी लागू करण्यात असलेल्या सवलती पुढे चालू ठेवण्याबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजीच्या बैठकीत पारित ठरावानुसार प्रस्तावित प्रायोगिक तत्वावरील मध्यान्ह भोजन योजना दि.३१.०३.२०२१ पर्यंत सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. महाराष्ट्र राज्यातील कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाची स्थिती दरम्यानच्या काळात सुधारली होती. तथापि, माहे फेब्रुवारी २०२१ पासून कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भावाची संख्या वाढत आहे. ही बाब विचारात घेता मंडळाने बांधकामाच्या ठिकाणी नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वितरीत करणे व बांधकाम कामगारांच्या हिश्याची रक्कम रू.०५/- वसूल न करणेबाबतची सवलत माहे नोंव्हेबर २०२० पर्यंत कार्यरत ठेवावी असाही निर्णय घेण्यात आला होता.

बांधकामाच्या ठिकाणावरील बांधकाम कामगारांशिवाय नाक्याच्या ठिकाणी नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारानांही मध्यान्ह भोजन वितरीत करणेबाबत क्षेत्रिय कार्यालय व कामगार संघटनांकडून मागणी होत आहे. शासन व मंडळ स्तरावरून मध्यान्ह भोजन योजना लागू करणेबाबत निर्णय घेताना बांधकामाच्या ठिकाणी व कामगार नाक्याच्या ठिकाणी नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता. सद्यस्थितीत मुंबई/ नवी मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, बारामती (पुणे) व नागपूर या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील सवलतीसह मध्यान्ह भोजन वितरीत करण्यात येत आहे. बांधकामाच्या ठिकाणाशिवाय नाक्याच्या ठिकाणी उपस्थित नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करणेबाबत निर्णय घेणे प्रस्तावित आहे. तसेच, कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील सवलत केव्हा पर्यंत सुरू ठेवावी याबाबतही निर्णय घेणे प्रस्तावित आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७ (४)/२०२१ :- कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत बांधकामाच्या ठिकाणी उपस्थित नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वितरीत करणे, कामगार हिश्याची रक्कम प्रतिभोजन रू.०५/- वसूल न करणे ही सवलत दि.३१.०५.२०२१ पर्यंत सुरू ठेवावी, मध्यान्ह भोजन वितरण केवळ बांधकामाच्या ठिकाणी करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०५ :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भाव कालावधीत नुतणीकरण न झालेल्या व बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू किंवा नैसर्गिक मृत्यू झालेल्या प्रकरणी बांधकाम कामगारांच्या वारसांना अर्थसहाय्य देणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत जिल्हा कार्यालये नियमित स्वरूपात कार्यरत नसल्याने काही नोंदीत बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण होऊ शकले नाही. कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मृत्यु पावलेल्या बुलढाणा, बीड व कोल्हापूर जिल्हयातील बांधकाम कामगारांच्या वारसांनी अर्थसहाय्य मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. तथापि, बांधकाम कामगारांच्या कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील मृत्यूसमयी सदर कामगारांची नोंदणी सक्रिय (जिवीत) नसल्याने जिल्हा कार्यालयाकडून त्यांच्या वारसांना लाभ दिलेला नाही.

मा. मंत्री महोदय, ग्रामविकास विभाग यांनी कोल्हापूर जिल्हयातील कै.भाऊसो शिवाजी खुर्दाळे या नोंदीत कामगारचा बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या वारसांना अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मंडळाकडे सादर केला आहे. सरकारी कामगार अधिकारी, बुलडाणा यांनी कै. विनोद आबाराव चव्हाण या कामगाराचा कोविड विषाणूमुळे मृत्यू झाला असल्याचे कळविले आहे. तसेच, असंघटीत मजदूर पंचायत संघटना, बीड यांचेकडून कै. विठ्ठल नामदेव माने या बांधकाम कामगाराचा हृदय विकाराने मृत्यू झाल्याचे कळविले आहे व सदर नैसर्गिक मृत्यू प्रकरणी वारसांना अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मार्गदर्शनार्थ सादर केला आहे. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील लॉकडाऊन मुळे जिल्हा कार्यालये नियमित कार्यरत नसल्यामुळे नुतनीकरण होऊ न शकलेल्या बांधकाम कामगारांचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास अशा बांधकाम कामगारांच्या वारसांना योजनेचे देय लाभ देणेबाबत मंडळाच्या विचारविनिमयासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मंडळ व जिल्हा कार्यालयास भविष्यातील असे प्रस्ताव येण्याचीही शक्यता आहे. मंडळ बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७(५)/२०२१ :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भाव कालावधीत जिल्हा कार्यालये नियमितपणे कार्यरत नसल्यामुळे नुतणीकरण होऊ न शकलेले व दि.०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ या कालावधीत बांधकामाच्या ठिकाणी अपघाती**

**मृत्यू किंवा नैसर्गिक मृत्यू झालेल्या प्रकरणी बांधकाम कामगारांच्या वारसांना मंजूर योजनेकरीता देय अर्थसहाय्य देण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०६ :- अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) बाबत बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या दिनांकाची कालमर्यादा शिथील करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, अटल बांधकाम कामगार आवास योजना ग्रामीण करीता शासन निर्णय दि.०७.१२.२०२० मध्ये दि.१५.१०.२०२० पर्यंत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना योजनेच्या लाभाकरीता अर्ज करता येईल" अशी अट नमूद आहे. तसेच अटल बांधकाम कामगार आवास योजना शहरी या योजनेकरीता दि.०४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात दि.३१.०५.२०२० पर्यंत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना योजनेच्या लाभाकरीता अर्ज करता येईल" अशी अट नमूद आहे.

उपरोक्त दोन्ही योजनांबाबत नोंदणीच्या दिनांकाची अट नमूद असल्यामुळे सद्यस्थितीतील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर योजनांचा लाभ घेता येणे शक्य होत नाही . त्यास अनुसरून उक्त दोन्ही शासन निर्णयातील बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या दिनांकाच्या अटी शिथील करून **"नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार"** संबंधित योजनेच्या लाभाकरीता पात्र राहतील याबाबत मंडळाच्या निर्णयास्तव शासन आदेश निर्गमित करण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५७ (६)/२०२१ :- अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) करीता उपरोक्त शासन निर्णयात नमूद अटी शिथील करून "नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार" संबंधित योजनेच्या लाभाकरीता पात्र राहतील. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०७ :- मंडळाचे सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ या वर्षाचे मूळ अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळाचे सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षांचे रु. १९४२.१३ कोटी जमेचे व रु. १२९६.३६ कोटी एवढया खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करुन मंडळाच्या मान्यतेअंती केंद्र व राज्य शासनास सादर करण्यात आले होते.

सन २०२०-२१ या चालू आर्थिक वर्षात माहे नोव्हें. २०२० पर्यंतची प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

➢ **सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे जमेचे सुधारीत अंदाज (गोषवारा)**

| अ.क्र | बाब (जमा) | अपेक्षित जमा | माहे एप्रिल २०२० ते नोव्हें., २०२० ची प्रत्यक्ष जमा (रु. कोटीत) | सन २०२०-२१ मधील जमेचे सुधारित अंदाज (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | १४००.०० | ८७६.३८ | १४२०.०० |
| २ | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ५१५.५८ | ३३४.७८ | ४८१.०० |
| ३ | बांधकाम कामगार नोंदणी फी | ०.७५ | ०.१० | ०.७५ |
| ४. | बांधकाम कामगार मासिक वर्गणी | १.८० | ०.१० | ०.५० |
| ५. | मध्यान्ह भोजन बांधकाम कामगार हिस्सा (रू.०५/- प्रमाणे) | २४.०० | निरंक | निरंक |
| | **एकूण जमा** | **१९४२.१३** | **१२११.३६** | **१९०२.२५** |

➤ **सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे खर्चाचे सुधारीत अंदाज (गोषवारा)**

| अ.क्र | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च | माहे एप्रिल २०२० ते नोव्हें., २०२०चा प्रत्यक्ष खर्च (रु. कोटीत) | सन २०२०-२१ मधील खर्चाचे सुधारितअंदाज खर्च (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| अ. | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १२१६.८६ | ८०२.६९ | १२२४.३५ |
| ब. | प्रशासकिय खर्च | ५८.०० | २०.३४ | ३३.३५ |
| क. | उपकर परतावा | २१.५० | १.५१ | ६.७३ |
| | **एकूण खर्च** | **१२९६.३६** | **८२४.५४** | **१२६४.५३** |

**ब. सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक**

➤ **मंडळाकडे मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष जमा,चालू वित्तीय वर्षातील सुधारीत अंदाज व सन २०२१-२२ या वर्षाच्या जमेचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत.**

**(रुपये कोटीत)**

| अ. क्र. | जमेची बाब | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ (अर्थसंकल्पीय) | २०२०-२१ चे सुधारीत अंदाज | २०२१-२२ प्रस्तावित जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. | उपकर | ११४५.९९ | १२२८.३६ | १५०२.७० | १४००.०० | १४२०.०० | १५५०.०० |
| ब. | कामगार नोंदणी फी | ०.८३ | १.९० | ५.७६ | ०.७५ | ००.७५ | १.२५ |
| क. | कामगार मासिक वर्गणी | १.०६ | ४.१० | ०.५६ | १.८० | ०.५० | १.२० |
| ड. | गुंतवणूक वरील व्याज | २११.८३ | ६०५.८३ | ६०६.७० | ५१५.५८ | ४८१.०० | ३६८.०० |
| इ. | मध्यान्ह भोजन लाभ शुल्क | ०.०० | ०.०० | १.६१ | २४.०० | निरंक | ३२.८५ |
| | **एकूण** | **१३५९.७१** | **१८४०.१९** | **२११७.३३** | **१९४२.१३** | **१९०२.२५** | **१९५३.३०** |

**मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवरील मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष खर्च,सन २०१९-२० चे सुधारित अंदाज व सन २०२०-२१ या वर्षाच्या मूळ अंदाजित खर्चाचा तपशील**

(रूपये कोटीत)

| खर्चाचा तपशिल | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ (अर्थसंकल्पीय) | २०२०-२१ चे (सुधारीत अंदाज) | २०२१-२२ (प्रस्तावित खर्च) |
|---|---|---|---|---|---|---|
| नोंदित बांधकाम कामगारांच्या विविध योजनांवरील खर्च | ६०.५२ | ३७६.०१ | १०३५.७७ | १२१६.८६ | १२२४.३५ | १५५८.०० |
| प्रशासकीय खर्च | ६.५० (१०.७४%) | १२.७१ (३.३८%) | ६०.१३ (५.८%) | ५८.०० (४.७६%) | ३३.३५ (२.७२%) | ३६.०८ (२.३१%) |
| **एकूण** | **६७.०२** | **३८८.७२** | **१०९५.९०** | **१२७४.८६** | **१२५७.८** | **१५९४.०८** |

## सन २०२१-२२ मधील अपेक्षित जमा व खर्चाचा गोषवारा *

(रूपये कोटीत)

| अ.क्र | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | १५५०.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १०४८.०० |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ३६८.०० | प्रशासकिय खर्च | ३६.०८ |
| ३ | नोंदणी फी | १.२५ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | २.०० |
| ४. | मासिक वर्गणी | १.२० | उपकर जमा करण्याचा खर्च १% च्या मर्यादेत. | १५.५० |
| ५. | मध्यान्ह भोजन लाभ शुल्क | ३२.८५ | प्रस्तावित योजना | ५१०.०० |
| | **एकूण जमा** | **१९५३.३०** | **एकूण खर्च** | **१६११.५८** |

**ठराव क्र.५७ (७)/२०२१ :- मंडळाचे सन २०२०-२१ या चालू वित्तीय वर्षाचे रू.१९०२.२५ कोटी जमेचे व रू.१२६४.५३ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे रू.१९५३.३० कोटी जमेचे व रू.१६११.५८ कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०८:- मा. महालेखापाल यांचेकडून सन २०१८-१९ या वर्षाचे लेख्यांचे लेखापरीक्षण झाले आहे. सदर वार्षिक अहवाल मंडळाच्या मान्यतेस् सादर**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सन २००७-०८ ते २०१७-१८ चे वार्षिक अहवाल खाली नमूद केल्यानुसार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आले आहेत.

| वित्तिय वर्ष | लेख्यास मंडळाची मान्यता दिल्याचा दिनांक | महालेखापाल कार्यालयाचा लेखापरिक्षण अहवाल दिनांक | विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर मंडळाचे वार्षिक अहवाल सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| २००७-०८ ते २०११-१२ | ०५.१२.२०१६ | ०८.०६.२०१७ | ११.०८.२०१७ |
| २०१२-१३ | ०६.०६.२०१७ | २३.०२.२०१८ | ३०.११.२०१८ |
| २०१३-१४ | ०६.०६.२०१७ | २३.०२.२०१८ | ३०.११.२०१८ |
| २०१४-१५ | ३०.१०.२०१८ | १२.०४.२०१८ | २७.०६.२०१९ |
| २०१५-१६ | ३०.१०.२०१८ | १२.०४.२०१८ | २७.०६.२०१९ |
| २०१६-१७ | १३.०३.२०२० | १०.१२.२०१९ | १५.१२.२०२० |
| २०१७-१८ | १३.०३.२०२० | १०.१२.२०१९ | १५.१२.२०२० |

मंडळाच्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षांच्या लेख्यास मंडळाच्या दि. १३.०३.२०२० रोजीच्या बैठकीत ठराव क्रमांक ५४(६)/२०२० अन्वये दिलेल्या मान्यतेनंतर

सदर वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण महालेखापाल कार्यालयाकडून दि. २८.०९.२०२० ते १६.१०.२०२० या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१८-१९ या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल महालेखापाल कार्यालयाच्या दि. १०.११.२०२० च्या पत्रान्वये मंडळास प्राप्त झाला आहे. या अहवालातील मुद्यांचे अनुपालन तयार करून वार्षिक अहवालात समाविष्ट करण्यात आलेले आहे. मंडळाच्या मान्यतेअंती सन २०१८-१९ चा वार्षिक अहवाल विधीमंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७(८)/२०२१ :- सन २०१८-१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवालाच्या अनुपालनासह विधीमंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**विषय क्र.०९:- मंडळाच्या सन २०१९-२० या वर्षाच्या वार्षिक लेख्यांस मंडळाची मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या मे. टी. व्ही. एच. शाह अँड कंपनी या सनदी लेखापालांनी तयार केले आहे. सदर लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करण्यात येईल.

*** सन २०१९-२० मधील जमा व खर्चाचा गोषवारा ***

**(रूपये कोटीत)**

| अ.क्र | जमेची बाब | जमा रक्कम | खर्चाची बाब | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | १५११.८८ | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | १०३५.७७ |
| २ | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ५७८.४७ | प्रशासकिय खर्च (५.८%) | ६०.१३ |
| ३ | नोंदणी फी | १.९० | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | २.८२ |
| ४. | मासिक वर्गणी | ४.०३ | उपकर जमा करण्याचा खर्च १% च्या मर्यादेत. | ०.०३ |
| ५. | इतर जमा | ०.२१ | घसारा | ०.५१ |
| | **एकूण जमा** | **२०९६.४९** | **एकूण खर्च** | **१०९९.२६** |

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७ (९)/२०२१ :- मंडळाच्या सन २०१९-२० या वर्षाच्या वार्षिक लेख्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**विषय क्र.१० मंडळाचे सन २०२०-२१ या वार्षिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालांच्या नियुक्तीबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या मान्यतेनुसार दरपत्रके मागवून नियुक्त करण्यात आलेले मे. टी. व्ही.एच.शाह अँड कंपनी या सनदी लेखापालांना गतवर्षीच्या मंजूर दराने सन २०२०-२१ चे लेखे तयार करणे व वस्तू व सेवा कर व आयकर विषयक कामकाज करण्याबाबत सहमती विचारण्यात आली होती. मे. टी. व्ही.एच.शाह अँड कंपनी यांनी सन २०२०-२१ चे लेखे तयार करण्यासाठी २०% वाढ व वस्तू व सेवाकर व आयकर कामकाजाकरीता रू.१.०० लक्ष एवढया रक्कमेच्या मागणीसह सहमती दर्शविलेली आहे. सदर वाढीव मागणीबाबत कामकाजातील वाढ, मनुष्यबळाचे वेतनवाढ, वस्तू व सेवाकराच्या क्लिष्ट तरतूदीचे विहीत वेळेतील अनुपालन, वस्तू व सेवाकर व आयकर तरतूदीनुसार विहीत वेळेत करावयाची कार्यवाही इत्यादी कारणमीमांसा नमूद केली आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७ (१०)/२०२१ :- मंडळाचे सन २०२०-२१ चे लेखे तयार करण्यासाठी तसेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी यापूर्वी नियुक्त मे. टी. व्ही. एच. शाह अँड कंपनी यांच्या सोबत वाटाघाटा करण्यात याव्यात व गतवर्षीच्या मंजूर दराने पुढील ०१ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**विषय क्र.११ माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयानुसार मंडळावर नियुक्त मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन ई- गव्हर्नन्स या संस्थेकडील सल्लागारांच्या मानधनाचे दर सुधारित करणेबाबत विचारविनिमय करणे**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजीच्या मंडळ बैठकीत पारित ठरावानुसार माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाच्या पॅनेलवरील मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन (Grant Thornton) या संस्थेकडून कामगार विभागात मंडळाच्या आयटी विषयक कामकाजाबाबत समन्वयाकरीता ०२ व मंडळाच्या मुख्यालयाकरीता ०२ अशा एकूण ०४ सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये निर्गमित वित्तीय उपाययोजनेस अनुसरून वित्त विभागाचे दि.१४.०८.२०२० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये सल्लागारांच्या मानधनाच्या दरात किमान ३०% कपात करावी असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. मंडळ व कामगार विभागाकरीता नियुक्त ०४ सल्लागारांना त्यानुसार मानधन अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय दि.०४.०५.२०२० रोजीच्या वित्तीय उपाययोजनेच्या अनुषंगाने दि.१४.०८.२०२० मधील शासन शुध्दीपत्रकान्वये करण्यात आलेली मानधनाच्या दरातील ३०% कपातीबाबतचा परिच्छेद वित्त विभागाचे शासन निर्णय दि.२२.१२.२०२० अन्वये रद्द करण्यात आला आहे.याबाबत प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५७ (११)/२०२१ :- वित्त विभागाचा शासन निर्णयान्वये वित्तीय उपाययोजनेबाबत निर्गमित करण्यात आलेल्या दि.०४.०५.२०२० रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून दि.१४.०८.२०२० रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये करण्यात आलेली ३०% कपात वित्त विभागाचे शासन शुध्दीपत्रक दि.२२.१२.२०२०अन्वये रद्द करण्यात आल्यामुळे माहिती व तंत्रज्ञान विभागाचे शासन निर्णय दि.०९.०५.२०१९ नुसार सल्लागारांचे मानधन अदा करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

## विषय क्र.१२ मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने दि. २७.०१.२०२१ अखेर राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक केलेल्या रू. ९६०० कोटी जमा उपकर रक्कमेच्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **बँक ऑफ बडोदा,** बीकेसी शाखा, सी-२६ जी ब्लॉक, वान्द्रे (पुर्व) मुंबई. | २९०४०३०००३८८१६ Receipt No.५९७२७४ | १६.०४.२०२० | १६.०४.२०२१ | ७०० | ५.८०% | ७४१.४९ |
| २. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक)** प्लॉट नं. ४७१-४७१, २४ रोड, खार रोड (पश्चिम), मुंबई - ४०००५२ | ११३९२०१००१०२५७२ Receipt No.१५६५३८ | ०८.०५.२०२० | ०८.०५.२०२१ | ५०० | ५.१०% | ५२५.९९ |
| ३. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-कार्पोरेशन बँक)** वान्द्रे हिल रोड, वान्द्रे (पश्चिम), मुंबई. | ५३०९४५०००००२५४३ Receipt No.२७०८३३ | १५.०५.२०२० | १५.०५.२०२१ | १००० | ५.०५% | १०५१.४६ |
| ४. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक)** प्लॉट नं. ४७१-४७१, २४ रोड, खार रोड (पश्चिम), मुंबई - ४०००५२ | ११३९२०१००१०२९५२ Receipt No.१५६५३८ | २२.०५.२०२० | २२.०५.२०२१ | १५०० | ५.०५% | १५७७.१९ |
| ५. | **कॅनरा बँक,** ओव्हरसीस मुख्य शाखा, कॅनरा बँक बिल्डींग, सी-१४ जी ब्लॉक, बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ | १५८९४०१००१६११/४ | ०८.०७.२०२० | ०८.०७.२०२१ | ७५० | ४.००% | ७८०.४५ |
| ६. | **इंडियन बँक (ई-** | ५०५२२६५९१५१ | ०८.०७.२०२० | ०८.०७.२०२१ | २५० | ४.००% | २६०.१५ |

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द. शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अलाहाबाद बँक)**, (२७५५) वांद्रे कुर्ला संकुल आर्य विद्या मंदीर सोसायटी प्लॉट नं. एस एफ-१ जी.एन ब्लॉक युटीआय हेड कार्टर वांन्द्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | Receipt No.८७७९६० | | | | | |
| ७. | **बँक ऑफ बडोदा**, बीकेसी ब्रॅन्च, सी-२६ जी ब्लॉक, वान्द्रे (पुर्व) मुंबई. | २९०४०३०००४०६१८ Receipt No.५९७२९० | ३१.०८.२०२० | ३१.०८.२०२१ | १००० | ३.७५% | १०३८.०३ |
| ८. | **पंजाब ॲन्ड सिंध बँक**, २७/२९ अम्बालाल जोशी मार्ग, फोर्ट मुंबई | ०३८५१४००००७३५७ Receipt No.९१४४५७ | १२.१०.२०२० | १२.१०.२०२१ | १६०० | ३.७०% | १६६०.०२ |
| ९. | **इंडियन बँक (ई-अलाहाबाद बँक)**, (२७५५) वांद्रे कुर्ला संकुल आर्य विद्या मंदीर सोसायटी प्लॉट नं. एस एफ-१ जी.एन ब्लॉक युटीआय हेड कार्टर वांन्द्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | ५०५३९५७१३८९ Receipt No. ४१११४३ | १४.०१.२०२१ | १४.०१.२०२२ | ११०० | ३.५०% | ११३९.०० |
| १०. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक)** प्लॉट नं. ४७१-४७१, २४ रोड, खार रोड (पश्चिम), मुंबई - ४०००५२ | ११३९२०१००१०२९५२ Receipt No.१५६५३८ | २७.०१.२०२१ | २७.०१.२०२२ | १२०० | ३.६०% | १२४३.७८ |
| | | **एकुण** | | | **९६००** | | **१००१७.५६** |

सदर मुदत ठेवीच्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज/Over Draft नसल्याबाबत संबंधित बँका दरमहा अहवाल मंडळास सादर करीत आहे. याशिवाय मंडळाचे लेखाअधिकारी

व कर्मचारी यांनी दर तिमाहीस बँकांना समक्ष भेट देऊन मंडळाच्या गुंतवणुकीची खात्री केलेली आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७ (१२)/२०२० :- मंडळाने गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने दि. २७.०१.२०२१ अखेर उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रू. १६०० कोटी एवढया जमा निधीची विविध राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक केलेली आहे. जमा निधीच्या गुंतवणूकीच्या गोषवाऱ्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**विषय क्र.१३ उपकर परताव्याबाबतच्या प्रस्तावावर विचारविनिमय करणे**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण ४३ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर ४३ प्रकरणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | संख्या |
|---|---|---|
| १. | शासन मान्यतेअंती परतावा केलेली प्रकरणे | १६ |
| २. | शासन स्तरावरून अमान्य प्रकरण | ०१ |
| ३. | शासन स्तरावरून प्रलंबित प्रकरण | ०१ |
| ४. | क्षेत्रिय कार्यालयाकडे पडताळणीकरीता प्रलंबित प्रकरण | २५ |
| | **एकूण** | **४३** |

सद्यस्थितीत, मंडळाकडे ३ उपकराचे प्रकरणे प्राप्त झालेली असून, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांच्याकडून नजरचुकीने/ अनावधनाने मंडळाच्या उपकर खाती भरणा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे:

| **अ. क्र.** | **प्राधिकरण/संस्था/ व्यक्तिचे नाव** | **उपकर परताव्याचे कारण** | **उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात)** |
|---|---|---|---|
| **१.** | श्री.सुरेश पांडूरंगजी शिरभाते | श्री.सुरेश पांडूरंगजी शिरभाते यांच्याकडून मंडळाच्या उपकर जमा करावयाच्या बँक खात्यात ६,४४४/- रक्कम भरणा करण्याऐवजी नजरचुकीने नगरपरिषदेमध्ये भरणाकरावयाची | ७७,९५९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रक्कम रु.८४,४०३/- मंडळाच्या बँक खात्यात दि. १९.०३.२०१९ रोजी RTGS द्वारे जमा करण्यात आली आहे त्याची मंडळाच्या बँक खात्यात जमा झाल्याबाबत खात्री करण्यात आली आहे.(८४,४०३- ६,४४४=७७,९५९/-) ७७,९५९/- फरकाची रक्कम श्री.सुरेश पांडुरंगजी शिरभाते यांनी रक्कम परत करण्यास विनंती केली आहे. | |
| २ | श्री. पंकज माधवराव पाटील | श्री. पंकज माधवराव पाटील यांनी २५.०२.२०२० रोजी २९,१००/- धनादेश द्वारे मंडळाच्या बँक खात्यात जमा केली होती. श्री. पंकज माधवराव पाटील यांनी पुनश्च नजरचुकीने औरंगाबाद महानगर पालिकेच्या बँक खात्यात रक्कम रु. १,०५,६५०/- भरणा करण्याऐवजी दि. २५.०२.२०२० रोजी धनादेश द्वारे सदर रक्कम मंडळाच्या बँक खात्यात जमा केली आहे .मंडळाकडे दुबार जमा रक्कमेची खात्री करण्यात आली आहे. उपकराची रक्कम दुबार भरली गेल्याने अर्जदार श्री. पंकज माधवराव पाटील यांनी दुबार भरणा करण्यात आलेल्या रक्कम रु.१,०५,६५०/- चा परतावा करण्यास विनंती केली आहे. | १,०५,६५०/- |
| ३ | ओरिएन्टंल यीस्ट इंडिया प्रा.लि. | ओरिएन्टंल यीस्ट इंडिया प्रा.लि.यांनी त्यांच्या एम.आय.डी.सी., केसुर्डी जिल्हा सातारा येथे यीस्ट उत्पादन प्रकल्प उभारत आहे. संबधित कंपनीने एम.आय.डी.सी., केसुर्डी जिल्हा सातारा येथील प्रकल्पावर बांधकाम परवानगीच्या वेळी उपकर रक्कम रु.३३,६०,६८०.७९ इतका उपकर भरणा एम.आय.डी.सी., मार्फत मंडळाच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. असे कळविण्यात आले आहे. त्यानंतर पुनश्च ओरिएन्टंल यीस्ट इंडिया प्रा.लि.यांनी उपकर रक्कम रु ८,५७,९४३.६१ मंडळाच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. संबधित कंपनीने त्याच्या उपरोक्त प्रकल्पाचे बांधकाम टोयो इंजिनीअंरिग इंडिया प्रा.लि. (सब कॉन्ट्रॅक्टर ) यांना दिले होते. टोयो इंजिनीअंरिग इंडिया प्रा.लि. यांनी या कामाच्या संर्दभात उपकर रक्कम रु.२०,१३,१७६/- दि०७.०८.२०१९ रोजी दुबार मंडळाच्या बँक खात्यात जमा केली आहे. मंडळाकडे दुबार जमा रक्कमेची खात्री करण्यात आली आहे. उपकराची रक्कम दुबार भरली गेल्याने अर्जदार | २०,१३,१७६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ओरिएन्टंल यीस्ट इंडिया प्रा.लि.अतिरिक्त भरणा केलेल्या उपकर रक्कम रु. २०,१३,१७६/- चा परतावा करण्यास विनंती केली आहे. | |
| | | **एकूण रक्कम रु** | **२१,९६,७८५/-** |

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५७(१३)/२०२० :-उपरोक्त तीन प्रकरणातील प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या एकूण रक्कम रु. २१,९६,७८५/-चा परतावा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१४ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करून त्यांना वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत निर्गमित शासन आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीस्तव सादर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्र.इबांका २०१८/प्र.क्र.९८/ कामगार-०७ दि.०८.०१.२०२१ अन्वये सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व जिल्हा कार्यकारी अधिकारी/ उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. (प्रत संलग्न) तसेच शासन निर्णय दि.११.०१.२०२१ अन्वये विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय व कार्यालय प्रमुख यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहे. सदर शासन आदेशाच्या प्रती मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आलेल्या आहेत. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५७(१४)/२०२० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व जिल्हा कार्यकारी अधिकारी/उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून**

**घोषित करून त्यांना वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत निर्गमित शासन आदेशाची नोंद घेण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**आयत्य वेळचा विषय क्र.१५ (१) :-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या विविध कार्यक्रम व उपक्रमांचा लाभ देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. ०४.०९.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठरावानूसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडील सद्यस्थितीत सुरू असलेल्या विविध कार्यक्रम व उपक्रम यांचा लाभ महाराष्टातील कोणत्याही कल्याण मंडळाच्या केंद्रावर उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावरून निर्धारित दराने प्रति कामगार रू. १११/- या प्रमाणे १० लक्ष नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगाराकरीता एकुण रू. ११.१० कोटी इतका निधी मंडळाकडून दि. २६.११.२०१९ रोजी वर्ग करण्यात आला होता.

मंडळाच्या दि. ०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये कामगार कल्याण मंडळाकडील विविध कार्यक्रम व उपक्रम यांचा लाभ निधी हस्तांतर केल्यापासून किती बांधकाम कामगार अथवा त्यांच्या कुटुंबियाना घेतला याबाबतचा त्रैमासिक अहवाल सादर करण्याबाबत कामगार कल्याण मंडळास कळविण्यात आले होते. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांनी माहे जानेवारी २०२० ते संप्टेबर २०२० या ०९ महिन्यांच्या कालावधीतील लाभ वाटपाचा अहवाल दि. १९.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मंडळास सादर केलेला आहे.

| अ. क्र. | विभागाचे नाव | मास्क व सॅनीटायझर वाटप कामगार/का.कु. संख्या | कामगार कुटुंबिय शिवण वर्ग प्रवेश | व्यसनमुक्ती व्याख्यानाकरीता उपस्थिती | कामगार केसरी/कुमार केसरी कुस्ती स्पर्धेकरीता | राज्यस्तरीय कबडड्डी स्पर्धेकरीता सहभाग | एकुण लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नायगाव, मुंबई | ४९६ | - | - | - | ३० | ५२६ |
| २. | ठाणे | ८५५ | ०१ | - | - | - | ८५६ |
| ३. | नाशिक | १०७३ | ०२ | ५४ | - | - | ११२९ |

| अ. क्र. | विभागाचे नाव | मास्क व सॅनीटायझर वाटप कामगार/का.कु. संख्या | कामगार कुटुंबिय शिवण वर्ग प्रवेश | व्यसनमुक्ती व्याख्यानाकरीता उपस्थिती | कामगार केसरी/कुमार केसरी कुस्ती स्पर्धेकरीता | राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेकरीता सहभाग | एकुण लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | पुणे | १०० | ०१ | - | ०१ | - | १०२ |
| ५. | औरंगाबाद | ८५१ | ६ | - | -- | - | ८५७ |
| ६. | अकोला | २८ | ५३ | - | - | - | ८१ |
| ७. | नागपूर | ५६० | ३७ | - | - | - | ५९७ |
| | एकुण | ३९६३ | १०० | ५४ | ०१ | ३० | ४१४८ |

कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांनी त्यांच्या दि. १८.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सन २०२०-२१ करीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम व उपक्रम यांचा लाभ घेता यावा याकरीता प्रति बांधकाम कामगार रू. १११/- प्रमाणे निधी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास वर्ग करण्याबाबत विनंती केलेली आहे.

**आयत्या वेळचा विषय ठराव क्र.५७ (१५)(०१)/२०२१:- सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणारे उपक्रम व कार्यक्रम यांचा लाभ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना घेता यावा याकरीता शासन स्तरावरून निर्धारित दराने प्रति बांधकाम कामगार रू. १११/- प्रमाणे सरासरी १० लक्ष बांधकाम कामगारांकरीता रू.११.१० कोटी एवढा निधी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास वर्ग करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, कामगार कल्याण मंडळाचे उपक्रम व कार्यक्रमाचा लाभ घेतलेल्या बांधकाम कामगारांचा तपशील दर तिमाहीस मागविण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |